# मुंबई विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

## कुलपती पी. सी. अलेक्झांडर आंतर-महाविद्यालयीन उत्स्फूर्त मराठी वक्तृत्व स्पर्धा
## ● स्पर्धेचे नियम ●

स्पर्धेची तारीख: ७ ऑक्टोबर २०२५
वेळ: सकाळी ९:०० वा.
स्थळ: विद्यापीठ विद्यार्थी भवन, चर्चगेट, मुंबई

### पात्रता

- मुंबई विद्यापीठाचे संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था व अध्यापन विभाग यामधील पूर्णवेळ नियमित विद्यार्थी कुलपती पी. सी. अलेक्झांडर आंतर-महाविद्यालयीन उत्स्फूर्त मराठी वक्तृत्व स्पर्धेमध्ये सहभाग घेऊ शकतात.
- सहभागी विद्यार्थ्याचे वय ३० सप्टेंबर २०२५ रोजी २५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

### सहभाग

- प्रत्येक संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था / विद्यापीठाचा शैक्षणिक विभाग कुलपती पी. सी. अलेक्झांडर आंतर-महाविद्यालयीन उत्स्फूर्त मराठी वक्तृत्व स्पर्धेसाठी केवळ एका विद्यार्थ्याचे नामांकन करावे.
- संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थेचे संचालक / विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे विभागप्रमुख यांनी आपल्या स्वाक्षरी पत्राद्वारे विद्यार्थ्याचे नामांकन करावे.
- स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही.

### स्पर्धा प्रक्रिया

- स्पर्धेचे विषय स्पर्धेच्या ठिकाणी दिले जातील.
- प्रत्येक स्पर्धकास पाच विषयांपैकी एक विषय चिठ्ठीद्वारे प्राप्त होईल.
- सादरीकरणापूर्वी ३० मिनिटांची तयारीसाठी वेळ दिली जाईल.
- प्रत्येक स्पर्धकास बोलण्यासाठी ५ मिनिटांचा वेळ दिला जाईल. ४ मिनिटांनंतर सूचना बेल वाजवली जाईल.
- स्पर्धकांचा क्रम लॉटरी पद्धतीने ठरविला जाईल.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

## प्रवास खर्च

- या स्पर्धेसाठी स्पर्धकांच्या प्रवासाशी संबंधित सर्व खर्च संबंधित संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था / विद्यापीठ शैक्षणिक विभाग यांनी करावा.

## पारितोषिके व प्रमाणपत्रे

- स्पर्धेतील विजेता (प्रथम क्रमांक), कुलपती पी. सी. अलेक्झांडर आंतर-विद्यापीठीय उत्स्फूर्त मराठी वक्तृत्व स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करील.
- सर्व स्पर्धकांना स्पर्धेच्या दिवशी सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
- स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त करणाऱ्या स्पर्धकांना स्पर्धेच्या दिवशी गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.